महाराष्ट्र शासन,

गृह विभाग

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील तरतुदी व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार गृह विभागाच्या अधिपत्याखालील पोलीस विभागातील जिल्हा पोलीस दलातील पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पोलीस दलातील पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई (गट-क) व कारागृह विभागातील कारागृह शिपाई (गट क) ची पदे भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरीक्षा पोर्टल यांचे मार्फत स्पर्धात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा फक्त www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, सदर जाहिरात पोलीस विभागाच्या www.mahapolice.gov.in व पोलीस घटक प्रमुखांच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई (गट-क) / बॅन्डस्मन (गट-क), लोहमार्ग पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई (गट क) साठी आवेदन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा महाराष्ट्रातील खालील जिल्ह्यांमध्ये घेण्यात येईल. उमेदवारांची नोंदणी संख्या पाहून जिल्ह्यांची यादी व परीक्षा केंद्र अंतिम करण्यात येईल.

(१) अहमदनगर, (२) अकोला, (३) अमरावती, (४) औरंगाबाद, (५) बीड, (६) भंडारा, (७) बुलढाणा, (८) चंद्रपूर, (९) धुळे, (१०) गडचिरोली, (११) गोंदिया, (१२) हिंगोली, (१३) जळगांव, (१४) जालना, (१५) कोल्हापूर, (१६) लातूर, (१७) मुंबई शहर, (१८) मुंबई उपनगर, (१९) नागपूर, (२०) नांदेड, (२१) नंदूरबार, (२२) नाशिक, (२३) उस्मानाबाद, (२४) परभणी, (२५) पुणे, (२६) रायगड, (२७) रत्नागिरी, (२८) सांगली, (२९) सातारा, (३०) सिंधुदूर्ग, (३१) सोलापूर, (३२) ठाणे, (३३) वर्धा, (३४) वाशिम, (३५) यवतमाळ, (३६) पालघर.

**-: परीक्षेचे वेळापत्रक :-**

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | दिनांक ०३/०९/२०१९ पासून ते दिनांक २३/०९/२०१९ (रात्री ११.५९ वा.पर्यंत). |
| परीक्षेचा वेळापत्रकाचा तपशील महापरीक्षा पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येईल. | |

१) भरती प्रक्रिया संबंधीत सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

२) **उपलब्ध पदसंख्या:-** पोलीस घटक प्रमुखांनी त्यांच्या जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे.

३) स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार संबंधीत पोलीस घटक प्रमुखांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. त्याचप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाकरिता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील गुणनुक्रमानुसार पात्र उमेदवारांचा शासन विहित नियमानुसार विचार केला जाईल. सदर पद भरती प्रक्रियेसंबंधात वाद, तक्रारी उद्भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार संबंधीत पोलीस घटक कार्यालयाच्या भरती प्रक्रियेत नेमणूक करण्यात आलेल्या अपिलीय अधिकारी यांना राहील.

४) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा

शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच भरावी. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण, अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी झाल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही.

५) सदरहू भरती प्रक्रियेत कोणत्याही पदासाठी मुलाखत (मौखिक परीक्षा) घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रियेत प्रथम घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात शारिरीक चाचणीसाठी उमेदवारांची निवड केली जाईल. अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीकरिता ज्या ज्या वेळी मागणी केली जाईल त्या त्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच, तात्पुरती निवडसूची तयार झाल्यावर कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविले जाईल त्या वेळी शैक्षणिक व इतर संबंधातील मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीकरिता भरती समितीकडे उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

**६) शारिरीक पात्रता:-**

**जिल्हा/लोहमार्ग पोलीस बलातील पोलीस शिपाई, बॅन्डस्मन व कारागृह विभागातील कारागृह शिपाई:**

| | महिलांकरिता | पुरुषांकरिता |
|---|---|---|
| (i) उंची | १५५ सें.मी.पेक्षा कमी नसावी. | १६५ सें.मी.पेक्षा कमी नसावी. |
| (ii) छाती | --- | न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. |

**६.१ सूट :-** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नलक्षविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील उमेदवारांच्या बाबतीत खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल:

(i) **उंची :** ४.० सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(ii) **छाती :** छातीच्या मोजमापाची आवश्यकता नाही.

**टीप:-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ चा उपखंड (क) नुसार विहित केलेल्या शारिरीक पात्रता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील उमदेवारांच्या बाबतीत वरीलप्रमाणे शिथील करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

**६.२ बॅन्डस्मन पदाच्या उमेदवारासाठी:**

(i) **उंची :** २.५ सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

(ii) **छाती :** २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून.

**टीप :-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ चा उपनियम २ चा खंड ब चा उपखंड ब मधील (i) व (ii) मध्ये विहित केलेल्या शारिरीक पात्रतेमध्ये सूट देण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

**६.३ खेळाडू उमेदवारासाठी:**

(i) **उंची :** २.५ सें.मी. महिला व पुरुष उमेदवारांसाठी.

६.४ **पोलीस बलातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांबाबत:-** पोलीस बलातील बेपत्ता कर्मचारी किंवा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त करण्यात आहे अशा एकाच पात्र नातेवाईकास पोलीस बलातील भरतीसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रता शिथिल करण्यात येईल.

(i) **उंची :-** २.५ सें.मी. पुरुष व महिला उमेदवारांसाठी.

(ii) **छाती:-** २ सें.मी. न फुगवता व १.५ सें.मी. फुगवून पुरुष उमेदवारांसाठी.

७) **शैक्षणिक पात्रता:-** उमेदवारांनी खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास पूर्ण धारण करणे आवश्यक आहे:

| अ.क्र. | पदनाम . | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १. | पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई | महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा.अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| २. | लोहमार्ग पोलीस दलातील पोलीस शिपाई | |
| ३. | कारागृह विभागातील कारागृह शिपाई | |
| ४. | बॅन्डस्मन | महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |

**नक्षलग्रस्त भागासाठी शैक्षणिक अर्हतेत विशेष सूट:-** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेले अनुसूचित जमातीचे उमेदवार किंवा नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अथवा नलक्षविरोधी कारवाईत मृत अथवा गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील अथवा पोलीस कर्मचारी यांची मुले असलेले उमेदवार जे इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत ते भरतीकरता पात्र ठरतील. मात्र असे उमेदवार नक्षलग्रस्त भागाच्याबाहेर बदलीसाठी पात्र असणार नाहीत.

**टीप:-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ चा उपखंड (ब) नुसार विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त उमदेवारांच्या बाबतीत शिथील करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

**माजी सैनिक:** १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण असणाऱ्यांच्या बाबतीत नागरी परीक्षा इयत्ता १० वी उत्तीर्ण किंवा IASC (Indian Army Special Certificate of Education) प्रमाणपत्र व १५ वर्षे सैनिकी सेवा पूर्ण नसलेल्यांच्या बाबतीत इयत्ता १२ वी परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**अन्य अर्हता :-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये दिनांक २७.७.२०१६ च्या शासन आदेशान्वये सुधारणा केल्यानुसार पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्याचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षांच्या आंत परवाना धारण करण्यात येईल व या कालावधीत हा परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येतील, याबाबतचे बंधपत्र सादर केल्यास असा उमेदवार पोलीस शिपाई पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहील. त्याबाबतचे हमीपत्र अर्जदाराने देणे बंधनकारक आहे.

**८) वयोमर्यादा:-** वरील पदांसाठी दिनांक ३०.०९.२०१९ रोजी (आवेदन अर्ज सादर करावयाच्या महिन्याच्या शेवटच्या दिनांकास) किमान व कमाल वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील:

**पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील तसेच, लोहमार्ग पोलीस बलातील पोलीस शिपाई / बॅन्डस्मन व कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासाठी वयोमर्यादा:**

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | खुला | १८ वर्षे | २८ वर्षे |
| २. | मागास प्रवर्ग (अ.जाती, अ.जमाती, वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र., इ.मा.व., एस.ई.बी.सी., इ.डब्ल्यू.एस.) | १८ वर्षे | ३३ वर्षे |
| ३. | प्रकल्पग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ४. | भूकंपग्रस्त उमेदवार | १८ वर्षे | ४५ वर्षे |
| ५. | माजी सैनिक उमेदवार | १८ वर्षे | उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. |
| ६. | अनाथ | १८ वर्षे | ३३ वर्षे |
| ७. | पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | १८ वर्षे | ५५ वर्षे |

इतर उमेदवार

| अ.क्र. | प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | खुला वर्ग | मागास प्रवर्ग |
| १. | महिला उमेदवार | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| २. | खेळाडू उमेदवार | १८ वर्षे | २८+५ वर्षे | ३३+५ वर्षे. |
| ३. | पोलीस पाल्य | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ४. | गृहरक्षक | १८ वर्षे | २८ वर्षे | ३३ वर्षे |
| ५. | माजी सैनिकावर अवलंबून असलेले (मुलगा, मुलगी, पत्नी) उमदेवार | १८ वर्षे | २८+३ वर्षे | ३३+३ वर्षे |

**९) ऑनलाईन परीक्षेचे स्वरुप व अभ्यासक्रम:-**

९.१ पोलीस शिपाई / कारागृह शिपाई पदासाठी:-

| अ.क्र | पदाचे नांव | | विषय | | | | एकूण प्रश्न | परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अंकगणित | सामान्य ज्ञान व चालू घडामोडी | बुध्दीमत्ता चाचणी | मराठी व्याकरण | | |
| १. | पोलीस शिपाई / कारागृह शिपाई | प्रश्न संख्या | २५ | २५ | २५ | २५ | १०० | ९० मिनिट |

९.२ बॅन्डस्मन पदासाठी:-

| अ.क्र | पदाचे | | विषय | एकूण | परीक्षा |
|---|---|---|---|---|---|

| | नांव | | अंकगणित | सामान्य ज्ञान व चालू घडामोडी | बुध्दीमत्ता चाचणी | मराठी व्याकरण | प्रश्न | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बॅन्डसमन | प्रश्न संख्या | २५ | २५ | २५ | २५ | १०० | ९० मिनिट |

१०) **परीक्षा शुल्क:-**

१०.१ खुला वर्ग- रुपये ४५०/-

१०.२ मागास वर्ग- रुपये ३५०/-

उमेदवार आपल्या सोईनुसार भरणा करु शकतात. भरण्याकरिता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत. (क्रेडीट कार्ड / डेबिट कार्ड / इंटरनेट बँकिंग / भीम UPI)

११) **अर्ज करण्याची कार्यपध्दती व सूचना :-**

११.१ उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगईन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजुला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करुन यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या / तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साईनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे / तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या / तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. (Activation लिंक ही २ दिवसांकरिता active असेल). उमेदवाराने त्याची / तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे यूजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल.

**टिप:- USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल.**

११.२ उमेदवाराचे नांव, वडीलांचे / पतीचे नाव, आडनाव, वडीलांचे नाव, आईचे नांव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.

११.३ छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती- कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे. [टिप:- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे.]

११.४ पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गांव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. सहित माहिती भरावी.

११.५ त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिनी आपला जात प्रवर्ग निवडावा.

उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्याआधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे. जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वत: घ्यावी.

११.६ ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक / आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी.

११.७ तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र किंवा शासनाने संगणक अर्हता म्हणून मान्यता दिलेली परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य यासंबंधीची माहिती द्यावी.

११.८ शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल.

११.९ एकदा शैक्षणिक तपशील प्रविष्ट केले की अर्जदारास पुढे या बटणावर क्लिक करावे लागेल. त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

११.१० उमेदवारास (१) पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई, (२) पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील बॅन्डस्मन, (३) लोहमार्ग पोलीस दलातील पोलीस शिपाई व (४) कारागृह विभागातील कारागृह शिपाई अशा एकूण ४ पदांसाठी आवेदन अर्ज सादर करता येतील. परंतु एकाच पोलीस घटकातील एकाच पदासाठी एकापेक्षा जास्त अर्ज सादर करता येणार नाहीत. (उदाहरणार्थ:- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदासाठी एकापेक्षा जास्त अर्ज भरता येणार नाहीत). जर एका उमेदवाराने एकाच पोलीस घटकातील एका पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत. असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.

११.११ आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल:

| Sr. No. | Post name in English | Post Name in Marathi |
|---|---|---|
| १. | District Police Constable | जिल्हा पोलीस शिपाई |
| २. | District Police Bandsman | जिल्हा पोलीस बॅन्डस्मन |
| ३. | Railway Police Constable | लोहमार्ग पोलीस शिपाई |
| ३. | Jail Department Sepoy | कारागृह विभाग शिपाई |

११.१२ त्यानंतर उमेदवारास पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह (Save) करणे आवश्यक आहे.

११.१३ उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल.

११.१४ उमेदवाराने सगळ्या नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पध्दतीने (इंटरनेट बँकिंग, केडिट कार्ड/ डेबिट कार्ड, भीम UPI ) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट (Submit) हा पर्याय उपलबध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.

११.१५ ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेस ११.५९ PM नंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

११.१६ जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिंग आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल. कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलीची योग्य

प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री क्रमांक १८००३०००७७६६ वर कॉल करा.

नोंद:- नोंदणीमधील तपशील जसे की वापरकर्ताचे नाव (USER NAME) ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), पसंतीचे परीक्षा केंद्र १/२/३, जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी, शैक्षणिक पात्रतेचा तपशील इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**१२) अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:-**

१२.१ युजरनेम व पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

१२.२ अर्ज प्रिंट करण्यासाठी **" प्रिंट प्रिव्ह्यू (Print Preview)"** या पर्यायावर क्लिक करा.

**नोंद: उमेदवाराने आपला PDF स्वरुपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वत: जवळ ठेवावा.**

**१३) महत्वाच्या सूचना:-**

१३.१ उमेदवारास देण्यात येणारे परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.

१३.२ परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकिय कारणांसाठी सुध्दा किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याच्या प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

१३.३ उमेदवाराने त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या तिन्ही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रांपैकी परीक्षा केंद्र नेमूण देण्यात येईल.

१३.४ उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.

**१४. सर्वसाधारण सूचना :- (कार्यपध्दती, अटी व शर्ती):-**

१४.१ ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहीत परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा/ वेळापत्रक / परीक्षाकेंद्र / अर्ज क्रमांक इत्यादी बाबतची माहिती www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सबब, सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती/ कार्यक्रमाबाबत अद्यावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाऊनलोड करुन घेणेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

१४.२ ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

१४.३ उमेदवारांनी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरीही त्यांनी / तिने या पदाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहित ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

१४.४ निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती/ अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१४.५ उमेदवारास ऑनलाईल परीक्षा, शारिरीक चाचणी व कागदपत्रे पडताळणी इत्यादीकरिता स्वखर्चाने यावे लागेल.

१४.६ ऑनलाईन परीक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परीक्षेचे प्रवेश पत्र (www.mahapariksha.gov.in) वर उपलब्ध राहील. परीक्षेचे प्रवेशपत्र स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने उमेदवारास पाठविले जाणार नाही.

१४.७ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र वर नमूद केलेल्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने परीक्षेच वेळी सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले खालीलपैकी कोणतेही एक ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहीत परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा/ वेळापत्रक / परीक्षाकेंद्र / अर्ज क्रमांक इत्यादी बाबतची माहिती www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्यावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाऊनलोड करुन घेणेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

अ) मूळ पॅन कार्ड (Original Pan Card)
ब) मूळ पासपोर्ट (Original Passport)
क) मूळ वाहन अनुज्ञप्ती (Original Driving Licence)
ड) मूळ मतदार ओळखपत्र (Original Voter ID)
इ) मूळ फोटोसह राष्ट्रीयकृत बँक अद्यावत पासबुक (Original Nationalized Bank updated passbook with photo attached)
ई) मूळ आधारकार्ड ( Original Aadhar Card)

उमेदवाराने स्वत: डाऊनलोड केलेले प्रवेशपत्र निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. तसेच ऑनलाईन परीक्षा समाप्तीनंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करता येणार नाही.

१४.८ उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. ऑनलाईन परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार आवश्यक तेवढ्या प्रवर्गनिहाय उमेदवारांची शारिरीक चाचणीसाठी निवड करण्यात येईल. ऑनलाईन परीक्षा व शारिरीक चाचणी यामध्ये मिळालेले गुण एकत्र करुन गुणवत्ता यादी तयार केल्यानंतर आवश्यक तेवढ्या उमेदवारांची तात्पुरती निवडसूची तयार करुन उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. तात्पुरत्या निवड सूचीमधील जे उमेदवार कागदपत्र पडताळणीत पात्र ठरतील, त्यांचाच निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल.

१४.९ सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष,

भरती समिती यांनी राखुन ठेवले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**१५. नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी:-**

१५.१ उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा [डोमीसाईल (Domicile) प्रमाणपत्र धारण करणे बंधनकारक] अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

१५.२ सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

*१५.३ विहीत वयोमर्यादेतील शासकिय / निमशासकिय सेवेतील कर्मचाऱ्यांना वयोमर्यादेत कोणत्याही प्रकारची सूट दिलेली नाही. सदरील पद भरतीकरीता घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांचे कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहीत मार्गाने विहीत मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे. अशा परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. त्याबाबतची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.*

**१६) आरक्षण:-**

**१६.१ मागासवर्गीय आरक्षण:-**

१६.१.१ विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले लगतच्या आर्थिक वर्षाचे मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non Creamy Layer Certificate) तसेच प्रमाणपत्रांची साक्षांकित छायाप्रत कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

१६.१.२ शासन, समान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक: बीसीसी-२०११/प्र.क्र.२६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ अन्वये ज्या उमदेवारांची निवड मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे. अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासणीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील.

१६.१.३ विजा (अ), भज (ब), भज (क) व भज (ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदांसाठी संबंधित वर्गवागरीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमदेवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

१६.१.४ सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकरिता शासन निर्णय, समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक :सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर २०१८ अन्वये विहीत करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय, समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जूलै २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील आरक्षणाकरीता ग्राह्य धरण्यात येतील.

१६.१.५ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : राधाओ-४०१९ /प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**१६.२ समांतर आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी:** उमेदवार ज्या समांतर आरक्षणासाठी दावा करु इच्छितो, त्या समांतर आरक्षणाच्या दाव्याबाबत आवेदन अर्जामध्ये स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**१६.२.१ महिलांसाठी:-** महिलांची आरक्षीत पदे शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक ८२/२००१/मसेआ-२००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५.५.२००१ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरण्यात येतील. महिला उमेदवार ही महाराष्ट्र राज्यातील असणे आवश्यक. महिलांकरिता ३०% समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

खुला (महिला) आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांनी महिलांसाठीच्या राखीव पदाकरीता अर्ज करताना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले लगतच्या आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) प्राप्त करणे आवश्यक राहील. तसेच, सदरहू प्रमाणपत्र कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची निवड रद्द करण्यात येईल. महिला आरक्षणाच्या लाभार्थी उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मार्फत करणे आवश्यक राहील.

महिलांसाठी आरक्षित असलेली पदे संबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**१६.२.२ खेळाडूंसाठी:-** राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमाक राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२, दिनांक १.७.२०१६ व शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२, दिनांक १७.३.२०१७ मधील विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार पात्र उमेदवारांमधून भरती करण्यात येईल. खेळाडूंसाठी ५% समांतर आरक्षण ठेवणेत आले आहे.

खेळाडू उमेदवारांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी आवेदन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने, अर्ज सादर करण्यापुर्वी त्याच्या खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी संबंधीत विभागीय उपसंचालक यांच्याकडून पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे.

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १.७.२०१६ मधील तरतुदींनुसार खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात आली आहे.

शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, निर्णय क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुंसे-२, दिनांक १८ ऑगस्ट २०१६ मधील तरतुदीनुसार खेळाडू आरक्षणाकरीता क्रिमीलेअरची अट लागू राहणार नाही. तसेच त्या त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

**१६.२.३ प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त आरक्षण:-**

शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००९ अन्वये प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त व भूकंपग्रस्त अन्वये समांतर आरक्षणाची सवलत देण्यात आली आहे. त्याचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी त्याबाबत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र, तसेच उक्त प्रमाणपत्रावर उमेदवाराचे संपूर्ण नाव असणे आवश्यक आहे. तसेच सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे.

**१६.२.४ माजी सैनिकांसाठी:-** भूदल, नाविक दल व हवाईदल सेवेमध्ये सहा माहिने व त्यापेक्षा अधिक सेवा केली असेल याप्रमाणे संरक्षण सेवेमध्ये केलेली एकूण सेवा, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,

परिपत्रक क्रमांक एमआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६.३.१९९९ मधील तरतुदींनुसार माजी सैनिकांसाठी १५% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**१६.२.५ अंशकालीन कर्मचारी:-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/ २००९/१६-अ, दिनाक २७.१०.२००९ अन्वये सुशिक्षीत रोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना गट क पदामधील सरळसेवेच्या करावयाच्या नियुक्तीसाठी १०% समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. सदरहू आरक्षणापैकी ५% आरक्षण हे शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक लवेसु-३६१३/प्र.क्र.२३८/पोल-५अ, दिनांक २२.८.२०१४ अन्वये पोलीस पाल्यांसाठी वर्ग केले असल्याने पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी ५% आरक्षण देय आहे.

**१६.२.६ पोलीस पाल्य:-** शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक लवेसु-३६१३/प्र.क्र.२३८/पोल-५अ, दिनांक २२.८.२०१४ मधील तरतुदीं व शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक पोलीस-१८१५/प्र.क्र.३०६/पोल-५अ, दिनांक १६.२.२०१६ मधील मार्गदर्शनानुसार पोलीस दलातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी ३ टक्के पदे पोलीस भरतीत राखीव ठेवण्यात येत आहेत.

**१६.२.७ गृहरक्षक / होमगार्ड आरक्षण:-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम ८ (iii) नुसार पोलीस शिपाई पदांवर नियुक्ती करतांना एकूण पदांच्या ५% पदे होमगार्डमध्ये जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात कमीत कमी ३ वर्षे (१०९५दिवस) एकत्रित सेवा झालेल्या व सेवाप्रवेश नियमानुसार पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक शैक्षणिक व शारीरिक पात्रता पूर्ण करणाऱ्या, विहित वयोमर्यादेतील उमेदवारांसाठी समांतर आरक्षणांतर्गत राखीव आहेत. जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात ३ वर्षे (१०९५ दिवस) सेवा पूर्ण नसलेल्या उमेदवारास गृहरक्षक पदाचे आरक्षण लाभ देय होणार नाही. तसेच, जाहिरातीच्या दिनांकास गृहरक्षक दलात ३ वर्षे (१०९५दिवस) एकत्रित सेवा पूर्ण केल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचा म्हणजेच समादेशक यांचा दाखला / प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**१६.२.८ अनाथ व्यक्तींचे आरक्षण:-** शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अमुजा-२०११/प्र.क्र. २१२/का-३, दिनांक २.४.२०१८ मधील तरतुदीनुसार अनाथ मुलांसाठी असलेल्या राखीव पदासाठी अर्ज करतांना उमेदवाराकडे, महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र उमदेवाराने कागदपत्र छाननीचेवेळी पडताळणी समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या उमदेवाराची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने / तिने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची तपासणी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्यामार्फत करणे आवश्यक राहील.

शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २.४.२०१८ मधील तरतुदींनुसार अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातुन गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य, प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही१०१२/प्र.क्र.१६/ १२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

शासकिय निमशासकीय कर्मचारी यांना वयोमर्यादेत कोणत्याही प्रकारची सूट दिलेली नाही. सदरील पद भरतीकरीता घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांचे कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत भरणे आवश्यक राहील. परवानगीची प्रत, कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करावी. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

समान गुण आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य- शासन, सामान्य प्रशासन विभाग, पूरकपत्र क्र. प्रानिमं-१२१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ०२/१२/२०१७ मधील तरतुदींनुसार लेखी परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करताना त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांस प्रथम प्राधान्यक्रम देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी, संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य म्हणून पात्र ठरविल्याबाबतचा पुरावा साक्षांकित प्रतीसाह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

**१६.२.९** महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील पोलीस शिपाई पदासाठीच्या सर्व अटींची पुर्तता करणाऱ्या मराठी भाषिक उमेदवारांना पोलीस शिपाई पदासाठी आवेदन अर्ज करता येईल. परंतु त्यांना महाराष्ट्रातील आरक्षणाचे लाभ देय राहणार नाहीत.

१७. **ऑनलाईन परीक्षेचा निकाल:-** महापरीक्षा पोर्टलवर फक्त उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेत प्राप्त केलेले गुण दर्शविण्यात येतील. गुणवत्ता यादी / शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी / निवड यादी संबंधीत पोलीस घटक प्रमुखांकडून तयार करण्यात येईल.

१८. **शारिरीक चाचणी:-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोळी सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची शारिरीक चाचणी घेतली जाईल.

**१९. शारिरीक चाचणीसाठी उमेवारांची निवड करणे:-** ऑनलाईन परीक्षेत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांबाबत ३३%) गुण मिळवून जे उमेदवार उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १:१० या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**स्पष्टीकरण:-** अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील १०० (१०X१०=१००) व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५० (५X१०=५०) उमेदवार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे १०० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील.

२०. **अनुभव व इतर अटी:-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३(२)(ब) या नियमाच्या खंड (क) चा उपखंड (i) नुसार बँड पथकातील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना बँड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्यामुळे ऑनलाईन चाचणीत उत्तीर्ण झालेल्या बॅन्डस्मन उमेदवारांची प्रात्यक्षिक चाचणी (Musical Test) घेतली जाईल. सदरहू चाचणी अर्हता चाचणी असेल. सदरहू प्रात्यक्षिक चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच, त्यांना लेखी व शारिरीक चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर गुणवत्तेनुसार बॅन्डस्मन पदासाठी निवड केली जाईल. सेवाप्रवेश नियमातील इतर अटी शर्ती बॅन्डस्मन पदावर निवड झालेल्या उमेदवारास लागू राहतील.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/१५/तुरुंग-१, दिनांक ६.११.२०१५ नुसार कारागृह विभागातील कारागृह शिपाई (गट-क) ही पदे पोलीस विभागामार्फत भरण्यात येतात. सदरहू पदासाठी महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणांसह लागू आहेत. इच्छूक उमेदवारांनी वर नमूद केल्याप्रमाणे आवेदन अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत.

२१. **तात्पुरती निवड यादी व अंतिम निवड यादीबाबत:-** उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत व शारिरीक चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे कागदपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांनुसार कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरती

निवडयादी / प्रतीक्षायादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार तयार करुन प्रसिध्द करण्यात येईल. (उदा. सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १६.३.१९९९, १३.८.२०१४ ची परिपत्रके व दिनांक १९.१२.२०१८ चे शुध्दीपत्रक). तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवारांच्याच कागदपत्राची पडताळणी करण्यात येऊन, कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच अंतिम निवडसूची / प्रतीक्षासूचीमध्ये समावेश करण्यात येईल. **भरती प्रक्रियेत कागदपत्रांची पडताळणी शेवटी करण्यात येणार असली तरी, उमेदवारांनी भरती प्रक्रियेत येतांना प्रवेशपत्रासोबत आवेदन अर्जाची प्रत, आवेदन अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात. भरती प्रक्रियेत मूळ कागदपत्रे सादर करण्याबाबत पोलीस घटक प्रमुखांकडून ज्या ज्या वेळी कळविण्यात येईल त्या त्या वेळी कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.**

एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक: प्रानिमं-१२१५/प्र.क्र.(२५५/१५)/१३-अ, दिनांक ०५ ऑक्टोबर २०१५, शासन पुरकपत्र क्रमांक: प्रानिमं-१२१७/प्र.क्र.(९२/१७)/१३-अ, दिनांक ०२ डिसेंबर २०१७ आणि त्याबाबत शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय, परित्रके इ. मध्ये नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे उमेदवारांची निवडयादी केली जाईल.

पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत निवड होऊन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारास पोलीस नियमावली, १९९९- भाग-३ मधील नियम ४० व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व घटक प्रमुखांनी वेळोवेळी विहित केलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडून प्रशिक्षणावर झलेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यांसहीत देय रक्कम भरणा करणे बंधनकारक आहे. अशा प्रकारचे बंधपत्र (बाँड/हमीपत्र) संबंधीत उमेदवारांकडून घेण्यात येईल.

**२२. इतर अटी:-**

२२.१ नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी उमेदवारांस बंधकारक राहतील.

२२.२ वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारास नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू राहील. तथापि, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन, वित्त विभाग निर्णय क्र.अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४ दिनांक २१ ऑगस्ट २०१४ नुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS)" या नावाने लागू होईल.

२२.३ समान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १ जूलै, २००५ अन्वये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ, ब, क आणि ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे अनिवार्य आहे.

२२.४ पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्तीपुर्वी वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी करण्यात येईल. सदरहू दोन्ही चाचण्यांमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारासच पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात येईल. ज्या उमेदवाराचा चारित्र्य अहवाल आक्षेपार्ह असल्यास संबंधित उमेदवारास नियुक्ती दिली जाणार नाही

व अशा प्रकरणी शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोलीस-१८१७/प्र.क्र.२११/पोल-५अ, दिनांक १९.७.२०१७ अन्वये गठीत केलेल्या उच्च स्तरीय समितीच्या निर्णयानुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल.

२२.५ मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक: माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी / हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२२.६ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ मंत्रालय मुंबई ३२, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार सदरील पदासाठी संगणक अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४.२.२०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्रधारक आसावा.

२२.७ शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

२३. **विशेष सूचना:-**

२३.१.१ उमेदवारांच्या माहितीकरिता www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर प्रस्तावित परीक्षेची कार्यप्रणाली (Software) कशी हाताळावी हे समजण्याकरिता नमुना परीक्षेची लिंक (link) उपलब्ध करुन देण्यात येईल.

२३.१.२ उमेदवारांना सरावासाठी (Mock Test) पीडीएफ स्वरुपात नमुना प्रश्नपत्रिका www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

२३.२ ऑनलाईन अर्जामध्ये भरलेली माहिती आणि कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यात तफावत आढळल्यास उमेदवाराची निवड भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा उमेदवाराने मागितलेले सामाजिक/ समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथील करणे इत्यादी बदल/ सवलती नामंजूर करण्यात येतील.

२३.३ परीक्षा कक्षात परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

२३.४ प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी अढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रियेसाठी अपात्र केले जाईल.

२३.५ जाहिरातीतील नमुद केलेले सर्व शासन निर्णय/ अधिसूचना / शासन परिपत्रके ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. तसेच महापरीक्षा पोर्टलचे संकेतस्थळावर लिंक करण्यात आलेले आहेत.

२३.६ नाशिक, धुळे, नंदूरबार, पालघर, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली या आदिवासी बहुल जिल्ह्यांतील जिल्हास्तरीय गट 'क' व गट 'ड' मधील पदे सरळसेवेने भरती करण्यासाठी एसईबीसी व ईडब्ल्यूएस आरक्षणासह सुधारीत बिंदूनामावली विहित केल्याबाबतच्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.६२४A/१८/१६-ब, दिनांक १६.०८.२०१९ च्या शासन निर्णयास शासनाने दिनांक २२.०८.२०१९ च्या शासन निर्णयान्वये स्थगिती दिलेली आहे. सदर प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पोलीस अधीक्षक, पालघर, रायगड, धुळे व नंदूरबार यांनी त्यांच्या आस्थापनेवर भरावयाच्या पदांची गणना केलेली आहे. दिनांक १६.०८.२०१९ च्या शासन निर्णय शासनाने रद्द केल्यास जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो. त्याप्रमाणे पदे भरण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना आहेत.

२४. उमेदवारांना काही अडचण भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईनवर वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास/प्रवेश पत्राबाबत विचारणा करण्यासाठी महापरीक्षा पोर्टलशी संबंधीत संकेतस्थळ व दूरध्वनी क्रमांक | enquiry@mahapariksha.gov.in<br>हेल्प लाईन १८००३०००७७६६ |
| २. | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यालयीन वेळेत) | ०२२-२२०२३६३७ |
| ३. | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचे **e-mail id:-** | adg.trg.office@mahapolice.gov.in |
| ४ | पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे कार्यालय दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०२०-२६२०८३५६ |

(डॉ.संजय शिंदे)
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन
पुणे शहर